
NES High School, Bhandup
II Preliminary Examination

Date : 09.12.2018 | Sub : Marathi | Marks : 50
Std. : X Div. ____ | Pages : 05 | Time : Hrs.
Roll No.______

## गदयविभाग

प्र.१ अ) खालील उता-याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. (०२)

१) खालील आकृती पूर्ण करा.




सुश्रुत: तुम्ही सगळे कोण आहात ?

कथा: अरे, असा घाबरतोस काय ? हे सगळे आपलेच मित्र आहेत. सगळयांशी चांगली मैत्री होईल तुझी. माझी ओळख तर तुला लहानपणापासूनच आहे. अरे, मी आहे कथा. गोष्ट हे माझंच दुसरं नाव.

आपली ओळख कशी काय ?

कथा: आईच्या, आजीच्या तोंडून इसापनीती, पंचतंत्र, अकबर-बिरबल अशा गोष्टी ऐकत ऐकत तुम्हांला मला वाचायची सवय लागते ना !

सुश्रुत: होऽऽ आता आठवलं आजी मला नेहमी कोल्हा, उंदीर, ससा-कासव यांच्या गोष्टी सांगायची.

कथा: बरं का सुश्रुत ! आकर्षक सुरुवात आणि परिणामकारक शेवट ही माझी वैशिष्ट्ये.

सुश्रुत: तुझे काही प्रकार असतात का ? कारण आज मराठीच्या मॅडम म्हणाल्या, "आपण 'साहस कथा' शिकूया."

कथा: अगदी बरोबर ! परीकथा, बोधकथा, विज्ञानकथा, ऐतिहासिक कथा हे माझेच अनेक उपप्रकार आहेत. शिवाय नाटक, मालिका, चित्रपट या सर्व ललितकलांचा पाया म्हणजे मी. मुळ कथा दर्जेदार असल्याशिवाय कोणतीही कलाकृती उत्तम होऊ शकत नाहीत. एवढंच नाही तर उत्तम निवेदन तंत्रामुळे मी खुलत जाते, रंगत जाते किंबहुना उत्तम निवेदनतंत्राचा वापर हे माझ्या यशाचं रहस्य.

सुश्रुत: तुला निर्माण करणा-या लेखकांची नावं मला सांग ना-

२) एका वाक्यात उत्तरे लिहा. (०२)

१. कथेची वैशिष्ट्ये कोणती आहेत ?

२. कथेच्या यशाचे रहस्य काय आहे ?

३) व्याकरण

१. खालील वाक्याला योग्य क्रियापद जोडून वाक्य पूर्ण करा. (०१)

अ. आजी मला रोज ससा-कासव यांच्या गोष्टी ............

ब. कथेचा आवाका फारच मोठा ..............

Scanned by CamScanner

(०१)

२. खालील शब्दांचे लिंग बदला.

ग. थोरला  घ. उंदीर

(०२)

४) स्वमत

तुम्हांला कशाप्रकारच्या कथा वाचायला आवडतात? सकारण लिहा.

(०२)

प्र.१ आ)१) खालील उता-याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.

१. जिल्हाधिका-यांनी निरंजनला दिलेल्या सवलती
- १.
- २.

२. मावशीच्या घरकडे आलेली मोठमोठी माणसे
- १.
- २.
- ३. भडसावळे गुरूजी

दुस-या दिवशीच्या वर्तमानपत्रात निरंजनाची स्तुती फोटोसकट छापून आली होती. भीषण अपघात टाळल्याचं श्रेय त्यालाच देण्यात आलं होतं. त्या दिवशी मावशीच्या घरकडे मोठमोठी माणसं आली. खुद्द जिल्हाधिकारी आले. शाळेचे मुख्याध्यापक आणि भडसावळे गुरूजीही आले. निरंजनने धावत पुढे होऊन गुरूजींचे पाय धरले. रडत रडत तो म्हणाला, "गुरूजी, मी नापास होणार. माझा कालचा नागरिकशास्त्राचा पेपर बुडाला."

"नाही रे बाळा. तू उत्तम नागरिक आहेस. शेकडो माणसांचा जीव वाचवलास आणि नागरिकशास्त्राच्या खऱ्याखुऱ्या परीक्षेत पास झालास. तुझं वर्ष कसं वाया जाईल? हे बघ, शाळेचे सगळे अधिकारी आलेत. खास बाब म्हणून तुझी नागरिकशास्त्राची परीक्षा उदया घेतली जाणार आहे, जिल्हाधिका-यांनी तुला सरकारी वसतिगृहात प्रवेश दयायचं ठरवलंय आणि वर वहयापुस्तकांच्या खर्चासाठी शिष्यवृत्ती मिळणार आहे. आता नको हं तुला वार लावून जेवायला."

असं म्हणून गुरूजींनी निरंजनाला हृदयाशी धरलं, तेव्हा सा-यांचेच डोळे पाणावले.

(०२)

२) चौकटी पूर्ण करा.

१. निरंजनला याचे श्रेय देण्यात आले. [ ]

२. निरंजन या विषयाच्या खऱ्याखुऱ्या परीक्षेत पास झाला. [ ]

(०२)

३) व्याकरण

कंसात दिलेल्या सूचनेनुसार काळ बदला.

१. भीषण अपघात टाळण्याचं श्रेय त्यालाच देण्यात आलं होतं.

(भविष्यकाळ करा.)

Scanned by CamScanner

२ . शाळेचं सगळे अधिकारी आले आहेत . (भूतकाळ करा . ) (०२)

४) स्वमत

निरंजन नागरिकशास्त्राच्या ख-याखु-या परीक्षेत पास झाला असे भडसावळे गुरूजींनी का म्हटले असावे ?

## पदयविभाग

(०२)

प्र . २ अ) कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा .

१) चौकटी पूर्ण करा .

१ . कवीने झाडाला दिलेली उपमा : → ☐

२ . अलगद उतरणारे थेंब : → ☐

३ . पानझडीनंतरचे, नवी वस्त्रे धारण करणारे झाड म्हणजे : → ☐

४ . फुटते शरीरभर पालवी याचा अर्थ : → ☐

झाड वसते ध्यानस्थ ऋषिसारखं मौन व्रत
धारण करून तपश्चर्या करत.... .
पक्षी झाडांचे कुणीच नसतात
तरीही झाड त्यांचं असतं
मुळावर घाव घातला तरी झाड मुकाट सहन करते
झाडांच्या पानावरून वहीच्या पानावर
अलगद उतरतात दवांचे टपोरे थेंब
झाडाकडे टक लावून पाहिलं तर
शरीरभर विरघळतो हिरवा रंग
रक्त होते क्षणभर हिरवेगार
आयुष्य होतं नुकत्याच खुडलेल्या फुलासारखं टवटवीत
झाडाचे बाहु सरसावलेले असतात मुसाफिरांना कवेत घेण्यासाठी
पानझडीनंतर झाड पुन्हा नवीन वस्त्र धारण करतं नव्या नवरीसारखं

(०२)

ब) एका वाक्यात उत्तरे लिहा .

१) झाडाच्या मुळावर घाव घातल्यावर त्याची प्रतिक्रिया काय असते?

२) पक्ष्यांच्या मंजुळ किलबिलाटात काय दडलेले असते?

## स्थूलवाचन

प्र . ३ वाळवंटी प्रदेशातील झाडांना काटे असण्याची कोणकोणती कारणे असावीत, असे तुम्हाला वाटते ? (०३)

Scanned by CamScanner

## व्याकरण विभाग

प्र.४अ) खालील सामासिक शब्दाचा विग्रह करून समासाचे नाव लिहा. (०२)

१.धर्माधर्म २.लग्नकार्य

ब) योग्य जोडया जुळवा. (०२)

| उदाहरण | अलंकार |
|---|---|
| १. बालिश बहुबायकांत बडबडला. | अ.उत्प्रेक्षा |
| २. आकाशातील चांदण्या जणू फुलांची पखरण! | ब.उपमा |
| ३. तो पहाडासारखा भक्कम आहे. | क.यमक |
| ४. जाणावा तो ज्ञानी ! पूर्ण समाधानी ! निःसंदेह मनी ! सर्वकाळ ॥ | ड.अनुप्रास |

क) सूचनेनुसार बदल करा. (०२)

१. मी पास होणार नाही. (होकारार्थी करा.)

२. माझी मान लाजेने खाली होई. (नकारार्थी करा.)

ड) खालील शब्दांचे सामान्यरूप व विभक्ती लिहा. (०२)

१.वातावरणात २. संतापाची

इ) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्या उपयोग करा. (०२)

१. आर्जव करणे

२. ध्यानी येणे

प्र.४ आ) शब्दसंपत्ती

१) समानार्थी शब्द लिहा. (०१)

१. रसना २. उदक

२) विरूध्दार्थी शब्द लिहा. (०१)

१. चिंचोळा X २. विचार X

३) खालील वाक्य लेखननियमानुसार लिहा. (०१)

रवींद्रनाथ टागोर हे विश्ववीख्यात बंगाली कवि होते.

४) खालील वाक्यांत योग्य ठिकाणी विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा. (०१)

अरेच्चा तू परीक्षेसाठी गेला नाहीस

५) खालील शब्दांचे पारिभाषिक शब्द लिहा. (०१)

१. Kitchan २. Project

६) खालील शब्द आकारविल्हयांनुसार लिहा. (०१)

वस्तू, वर्ष, बांगडया, वृद्ध

Scanned by CamScanner

(०१)

७) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.
   ३. ईश्वर नाही असे मानणारा
   ४. स्वतःविषयी वाटणारा अभिमान

(०१)

८) एका शब्दाचे अनेक अर्थ लिहा.
   अभंग

(०१)

९) शब्दातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्द लिहा.
   रानवारा

(०१)


१०) गटात न बसणारा शब्द ओळखून लिहा.
   गुलाबी, गुलाब, मोगरा, चाफा, जास्वंद

## उपयोजित लेखन


(०७)

प्र.५ खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा.

१) 'माझा पहिला उपवास' या विषयावर खालील मुद्दयांच्या आधारे प्रसंगलेखन करा.




२) खालील मुद्दयांच्या आधारे 'परिक्षाच नसत्या तर' या विषयावर लेखन करा.




......

Scanned by CamScanner